# ' महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था '

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके**, कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी

मो.नं. ९८८१४७७२७२ ई-मेल - drsdwarke@gmail.com

---

**प्रस्तावना**

मुंबई शहरासाठी १७२६ साली मेयर्स कोर्ट स्थापन करण्यात आले. १८५० च्या कायद्याने नागरी प्रशासनाचे स्वरूप अधिक स्पष्ट व व्यापक बनले. या कायद्याने मुंबईत स्थानिक स्वशासन अमलात आले. टाउन कमिटी आणि म्युनिसिपल कमिटी स्थापन करून या समित्याकडे आरोग्याशी निगडीत जबाबदा-या सोपविण्यात आल्या. १८६५ च्या कायदयाने मुंबईसह अन्य शहरांमध्ये म्युनिसिपल कमिशनर हे पद निर्माण करण्यात आले. त्यानंतर सर फिरोजशहा मेहतांच्या प्रयत्नातून १८७२ चा कायदा मंजूर झाला. या कायदयामुळे जस्टीसेस ऑफ पीसच्या ठिकाणी विविध मतदार संघातून प्रतिनिधींची निवडणूक घेण्यास सुरुवात झाली. याशिवाय इंग्रज गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांच्या १८८२ च्या ठरावामुळे नागरी प्रशासनात आणखी सुधारणा झाल्या. त्याचा पुढचा टप्पा म्हणून १८८८ च्या कायदा मानला जातो.

लॉर्ड रिपन यांच्यामुळे स्थानिक स्वशासनास अधिक स्वातंत्र्य देण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून १९०१ मध्ये मुंबई जिल्हा पालिका कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे नगरपालिकांच्या अधिकारात वाढ करण्यात येऊन शासनाच्या समितीमार्फत नगरपरिषदेचा अध्यक्ष निवडण्याची तरतूद करण्यात आली. १९६५ पूर्वी महाराष्ट्रातील विविध नगरपरिषदांसाठी वेगवेगळे कायदे अस्तित्वात होते. उदा - १९२५ चा मुंबई शहर नगरपालिका कायदा, १९२२ चा मध्य व वऱ्हाड प्रांत महानगरपालिका अधिनियम इ, मात्र ' महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नागरी अधिनियम-१९६५ ' नुसार सर्व नगरपरिषदांसाठी अस्तित्वात असलेले कायदे रद्द करण्यात येऊन एकच कायदा अस्तित्वात आला. या कायद्याबरोबरच १९९८ च्या सुधारित महाराष्ट्र नगरपरिषद कायदयानुसार महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदांचा कारभार चालत आहे.

या कायद्यानुसार महाराष्ट्रात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पुढील चार घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**अ) नगरपालिका (नगरपरिषद) -** शासनाने 'लहान नागरी क्षेत्र' म्हणून घोषित केलेल्या शहरांसाठी नगरपालिका तयार केल्या जातात.

**ब) महानगरपालिका -** शासनामार्फत 'मोठे नागरी क्षेत्र' म्हणून घोषित केलेल्या शहरांसाठी महानगरपालिका अस्तित्वात येते.

**क) नगरपंचायत -** ज्या क्षेत्रात ग्रामीण भागाचे रूपांतर शहरी भागात होत असते, अशा संक्रमण अवस्थेतील भागांसाठी नगरपंचायत स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

ड) **कॅन्टोन्मेंट बोर्ड-** सैन्यदलातील लोक किंवा सैनिक ज्या भौगोलिक क्षेत्रात वास्तव्य करतात त्या प्रदेशात छावणी बोर्ड स्थापन केले जाते. सैनिक प्रशासनाचाच एक भाग म्हणून या बोर्डाचा कारभार चालतो. भारत सरकारच्या संरक्षण विभागाच्या नियंत्रणाली कॅन्टोन्मेंट बोर्डाचा संपूर्ण कारभार चालतो. महाराष्ट्रात देवळाली (नाशिक), पूणे जिल्हयातील पुणे कॅम्प, खडकी, देहू, अहमदनगर, औरंगाबाद, कामठी (नागपूर) या सात ठिकाणी छावणी मंडळे आहेत. कॅन्टोन्मेंट अधिनियम - १९२४ नुसार या बोर्डाचा कारभार चालतो.

महाराष्ट्रात काही थंड हवेच्या किंवा ऐतिहासिक ठिकाणी लोकसंख्येची अट न घालता नगरपरिषदा स्थापन करून त्यांना स्वतंत्र दर्जा दिलेला आहे. उदा. चिखलदरा, खुलताबाद, महाबळेश्वर माथेरान, पाचगणी, पन्हाळा या ६ नगरपरिषदा, या व्यतिरिक्त औदयोगिक नगरवसाहत प्राधिकरणाबरोबरच इतर शहरी

स्थानिक स्वराज्य संस्था देखिल (त्यामध्ये टाऊन शिप, पोर्टट्रस्ट, विशिष्ट हेतू अधिकरण, राजपत्रित क्षेत्र समिती) स्थापन करण्याचा अधिकार ७४ व्या घटनादुरुस्तीने राज्य शासनाला देण्यात आला आहे.

**नगरपालिका/नगरपरिषद -**

ग्रामीण क्षेत्राच्या विकासाबरोबरच शहरी भागाच्या विकासासाठी शहरांमध्येही स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आल्या. ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार महाराष्ट्रात १९९४ मध्ये सुधारित नगरपरिषद कायदा मंजूर करण्यात आला. त्यानुसार २५ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना 'नागरी क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले. त्याबाबतची घोषणा राज्यशासन राज्याच्या राजपत्रात (गॅझेट) प्रसिद्ध करते. ही घोषणा करण्यापूर्वी सदर नागरीक्षेत्रात कृषीत्तर कार्यक्रमातील रोजगाराची टक्केवारी ३५% पेक्षा कमी असता कामा नये ही महत्वपूर्ण अट निर्धारित करण्यात आली आहे.

या कायद्यानुसार महाराष्ट्रातील नगरपरिषदेच्या क्षेत्रात फेरबदल करण्याचा अधिकार राज्यशासनाला देण्यात आला आहे. त्यानुसार नगरपरिषद क्षेत्रातील एखादे स्थानिक क्षेत्र वगळण्याचा व एखादे क्षेत्र नव्याने समाविष्ठ करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्राप्त झाला आहे. तसेच नगरपरिषद क्षेत्राचे एकत्रिकरण (विलिनीकरण) अथवा विभाजन करण्याचा अधिकारही शासनाला देण्यात आला आहे.

**नगरपालिकेची रचना** -

प्रत्येक नगरपरिषदेमध्ये लोकसंख्येच्या निकषांच्या आधारे सदस्य संख्या राज्यशासनामार्फत निश्चित केली जाते. नगरपरिषदेच्या सदस्यांना 'नगरसेवक' म्हणतात. नगरपरिषदेमध्ये किमान १७ आणि कमाल ६५ सदस्य असतात. त्यांची निवड गुप्त मतदान पद्धतीने प्रौढ मतदारांमार्फत होत असते. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या व नगरपरिषदेच्या मतदार यादीत नाव समाविष्ठ असलेल्या नागरिकास नगरपरिषदेचा निवडणूकीत मतदान करण्याचा हक्क देण्यात आला आहे.

**सदस्यत्वासाठी पात्रता-अपात्रता**

१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

2) त्या व्यक्तीचे वय २१ वर्षापेक्षा कमी असता कामा नयेः

३) कलम ११ नुसार मतदार यादीत सदर व्यक्तीच्या नावाची नोंद असावी.

४) ती व्यक्ती नगरपरिषदेची थकबाकीदार नसावी.

५) ती व्यक्ती शासन अथवा स्थानिक शासनाच्या सेवते पगारी नोकर नसावी.

वरीलप्रमाणे पात्रता-अपात्रतेच्या प्रमुख अटी व्यतिरिक्त अन्य काही विहीत अटींचेही पालन उमेदवारांनी करणे बंधनकारक आहे.

**कार्यकाल -**

नगरपालिकेच्या प्रत्येक सभासदाचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. मात्र अपवादात्मक परिस्थितीत हा कार्यकाल एका वर्षाने वाढविला जाऊ शकतो. निवडणूकीनंतर भरणाऱ्या पहिल्या बैठकीच्या दिवसापासून नगरपरिषदेचा कार्यकाल मोजण्यात येतो. एखादी नगरपरिषद मुदतपूर्व बरखास्त करण्याचा अधिकार राज्य शासनाला असतो. नगरसेवक स्वत: आपल्या पदाचा राजीनामा नगराध्यक्षांकडे देऊ शकतात. तसेच त्याला पदावरून हटविण्याचा अधिकार जिल्हाधिका-याला असतो.

**नगरपालिकेचे पदाधिकारी** (नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष)

नगरपालिकेच्या कार्याध्यक्षाला 'नगराध्यक्ष' असे महणतात. 'नगराध्यक्ष' हा त्या शहराचा प्रथम नागरिक असतो. नगराध्यक्षांच्या गैरहजेरीत उपनगराध्यक्ष कामकाज पाहतो. नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष हे पदाधिकारी म्हणून काम पाहतात.

**नगराध्यक्षांची कार्ये -**

नगराध्यक्ष हा नगरपालिकेचा कार्यकारी प्रमुख असतो. १९६५ च्या कायदयाच्या कलम ५८ नुसार नगराध्यक्षाला पुढील कार्ये करावी लागतात -

१) नगरपालिकेच्या बैठका बोलावणे, त्यांचे नियमन करून अध्यक्ष स्थान भुषविणे.

२) नगरपालिकेच्या प्रशासनावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

३) नगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

४) शासनाकडून मागविण्यात आलेली माहिती, अहवाल, विवरण/अभिलेख सादर करणे.

५) शहराचा प्रथम नागरिक या नात्याने शहरात येणा-या शासकीय पाहुण्यांचे स्वागत करणे, विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणे.

६) संकटकाळात अंमलात आणावयाची कामे पार पाडणे.

नगराध्यक्षाच्या गैरहजेरीत त्यांनी सोपविलेली कार्ये उपनगराध्यक्षांना पार पाडण्याचा अधिकार आहे.

**विषय समित्या -**

नगरपालिकेच्या कामकाजासाठी समित्या स्थापन केल्या जातात.

नगरपालिकेत एक स्थायी समिती असते. त्यात एक सभापती (नगराध्यक्ष), समितीचे सदस्य, सर्व विषय समित्यांचे सभापती, पालिकेच्या नगरसेवकांनी निवडलेले तीन सदस्य यांचा समावेश असतो त्या व्यतिरिक्त पुढील विषय समित्याही कार्यरत असतात .

१) सार्वजनिक बांधकाम समिती.

2) शिक्षण समिती

३) स्वच्छता, वैदयक व सार्वजनिक आरोग्य समिती.

४) पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती .

५) नियोजन आणि विकास समिती.

६) महिला व बालकल्याण समिती (या समितीचे अध्यक्षपद स्त्रीला देण्याची तरतूद आहे.) कोणताही सदस्य एकाचवेळी दोनपेक्षा अधिक समित्यांचा सदस्य राहू शकत नाही.

**नगरपालिकेच्या** सभा -

नगराध्यक्ष सर्वसाधारण सभा व विशेष सभा बोलावू शकतात. नगराध्यक्ष पदाची निवड झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत अध्यक्षांनी सर्वसाधारण सभा बोलविणे आवश्यक असते. दोन महिन्यातून एकदा सर्वसाधारण सभा बोलविणे आवश्यक असते. खालील परिस्थितीत अध्यक्षाला विशेष सभा बोलविता येते.

१) अध्यक्षाला आवश्यकता भासल्यास किंवा

२) एकूण सदस्यापैकी १/४ सदस्यांच्या लेखी मागणीवरून.

३) अध्यक्षांनी विशेष सभा बोलविली नाही तर १/४ सदस्य जिल्हाधिका-यांकडे १५ दिवस आधी मागणी करून विशेष सभा भरविण्याची विनंती करू शकतात. या सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी भुषवू शकतात.

**गणपूर्ती -**

सर्वसाधारण सभेसाठी १/३ सदस्य आणि विशेष सभेसाठी १/२ सदस्य उपस्थित असल्यास सभांच्या कामकाजास सुरवात होऊ शकते.

**मुख्याधिकारी-**

मुख्याधिकारी (Chief Officer) हा नगरपालिकेच्या प्रशासन यंत्रणेचा प्रमुख असतो. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परिक्षेमधून निवड झालेल्या उमेदवाराची राज्य शासनामार्फत

मुख्याधिकारी पदावर नेमणूक केली जाते, त्यांचे पद राज्य प्रशासकीय सेवेत (राजपत्रित अधिकारी) मोडते. त्याला पुढील प्रमुख कार्ये पार पाडावी लागतात.

१) प्रशासकीय प्रमुख या नात्याने नगरपालिकेचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे, हिशेब ठेवणे, हिशेब तपासणे.

२) नगरपालिकेतील विविध ठरावांची व निर्णयांची अंमलबजावणी करणे.

३) अध्यक्षांच्या सल्ल्याने बैठका बोलवणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

४) दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे, महत्वाच्या कागपत्रांवर शेरे लिहिणे व सहया करणे.

५) मुख्याधिकारी हा नगरपालिका व राज्यशासन यांच्यातील दुवा असतो.

६) नगरपालिकेच्या विकासाला चालना देणे.

७) लोकांच्या कल्याणासाठी असलेल्या सर्व प्रकारच्या शासकीय योजनांची माहिती लोकांना व्हावी यासाठी जनजागृती करणे. त्यात लोकसहभाग वाढविणे.

८) पालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय, आर्थिक कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. प्रशासनात कार्यक्षमता व जबाबदार वृत्ती निर्माण करणे.

९) शहरातील आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा इ. सेवासुविधा अधिक चांगल्याप्रकारे निर्माण करण्याकडे लक्ष देणे.

**नगरपालिकेची कार्ये -**

महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती, औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या प्रकरण तीन मधील कलम ४९ ते ७३ मध्ये नगरपरिषदेची आवश्यक कार्ये व स्वेच्छाधीन (ऐच्छिक कार्ये) नमुद केली आहेत. ७४ व्या घटनादुरुस्तीनेही १२ व्या परिशिष्ठात १८ विषयांचा कारभार नगरपालिकांकडे सोपविला आहे. त्या अनुषंगाने नगरपालिकांना पुढील कामे पार पाडावी लागतात.

अ) आवश्यक कार्य -

१) सार्वजनिक रस्ते, जागा, इमारती आदि ठिकाणी दिवाबत्तीची सोय करणे.

2) योग्य आणि पुरेशा प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

3) सार्वजनिक रस्त्यांची व जागांची साफसफाई करणे, मलनिस्सारणाची योग्य व्यवस्था निर्माण करणे.

४) शौचालयाची व्यवस्था पाहणे, केरक-याची योग्य विल्हेवाट लावणे. डोक्यावरून मैला वाहून नेण्यास कोणाही व्यक्तीला भाग पाडणार नाही किंवा त्यांची सक्ती केली जाणार नाही याची काळजी घेणे.

५) जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.

६) तलाव, विहीरी, बंधारे व तत्सम बाबी बांधणे, आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करणे.

७) स्मशान भूमीची व्यवस्था व त्याचे नियमन करने.

८) अग्निशमन दल ठेवणे आणि आगीपासून जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे.

९) लसिकरण, औषधांची फवारणी, रोग प्रतिबंधक उपाययोजना करणे, लोकांना आरोग्याच्या (वैदयकीय) सोई-सुविधा उपलब्ध करून देणे.

१०) सार्वजनिक रस्त्यांवर व जागांवर पाणी शिंपडणे.

११) सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर, खाजगी नसलेल्या रिकाम्या जागा येथील अडथळे (अतिक्रमण वैगेरे) दूर करणे.

१२) सार्वजनिक रस्त्यांना नावे देणे आणि जागांचा क्रमांक देणे.

१३) लोकसंख्या नियंत्रण,कुटूंब कल्याण यासारख्या राष्ट्रीय कार्यांना प्रोत्साहन देणे.

१४) धोक्याच्या इमारती पाडून टाकणे, इमारतीच्या सुरक्षित पुनर्वसनाबाबत दक्षता घेणे.

१५) शहरात प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करणे. त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

१६) सफाई कामगारांचे राहणीमान व त्यांच्या कामाबाबत सुधारणा करणे.

१७) नगरपालिका क्षेत्रात राहणा-या मागासवर्गीयांच्या कल्याणार्थ शासकीय योजनांची अंमलबजावणी करून त्यांच्या स्थितीत सुधारणा करणे.

१८) कलम १०५ मध्ये नमूद केलेले सक्तीचे कर संकलन करणे, करमणूक कर, मालमत्ताकर व्यवसाय कर व अन्य कर आकारणे व वसूल करणे

ब) **ऐच्छिक कार्ये -**

नगरपालिकेच्या उत्पन्नातून व मिळालेल्या निधीतून ऐच्छिक कार्ये पार पाडली जातात. पालिकेच्या आर्थिक क्षमतेवर ऐच्छिक कार्याची अंमलबजावणी अवलंबून असते. ही कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) सार्वजनिक रस्त्यांची योजना तयार करणे, त्यासाठी भुसंपादन करणे.

२) गलिच्छ वस्तीत सुधार कार्यक्रम राबविणे.

3) पालिका क्षेत्रातील गरीबी दूर करणे.

४) पाळीव जनावरांचे कोंडवाडे तयार करणे, त्यांच्या क्रूरपणास प्रतिबंध घालणे.

५) सार्वजनिक रुग्णालये, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू करणे. ग्रंथालय,वस्तुसंग्रहालय, व्यायामशाळा, विश्रांतीगृह, नगरसभागृह, दुकाने, नाटयगृहे बांधणे व त्यांची व्यवस्था पहाणे.

६) उद्याने, पार्क बांधणे. वाहनतळ उभारणे, वृक्ष सुशोभिकरण करणे.

७) नगरपरिषद क्षेत्रात जनगणना करणे.

८) कर्मचारी निवासस्थान बांधणे.

९) पीडादायक व्यवसायासाठी योग्य जागा उपलब्ध करून देणे.

१०) खाजगी वसतिगृहांना अनुदान देणे.

११) दुध व दुग्धजन्य पदार्थाचा पुरवठा करणे.

१२) जनावरांना चराई मैदाने तयार करणे, दुग्धशाळा सुरू करणे.

१३) वीज व गॅस पुरवठयासाठी बांधकाम करणे.

१४) मोकाट प्राण्यांची व्यवस्था लावणे, त्यांच्यापासून होणा-या उपद्रवाला प्रतिबंध करणे.

१५) समारंभ, जत्रा, प्रदर्शन, करमणूक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे अभिनंदनपर कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**महानगरपालिका -**

स्थानिक नागरी संस्थापैकी महानगरपालिका हा सर्वात मोठा प्रकार आहे. अन्य स्थानिक संस्थांच्या तुलनेत महानगरपालिकेला जादा अधिकार असतात. राज्य विधिमंडळाच्या कायदयानुसार महानगरपालिकेची स्थापना करण्यात येते. १९५० पूर्वी मुंबई राज्यात मुंबई येथेच एकमेव महानगरपालिका अस्तित्वात होती.

मुंबई महानगरपालिका अधिनियम-१८८८ नुसार मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाली. त्यानंतर फेब्रुवारी १९५० मध्ये पुणे, १९५१ मध्ये नागपुर, १९६४ मध्ये सोलापूर या ठिकाणी महानगरपालिकांची स्थापना करण्यात आली. सध्या महाराष्ट्रात २७ महानगरपालिका अस्तित्वात आहेत.

**महानगरपालिकेची स्थापना -**

लोकसंख्या आणि आर्थिक निकष यांच्या आधारे राज्यशासनामार्फत महानगरपालिकेची स्थापना केली जाते. साधारणत: ५ लाख लोकसंख्येपेक्षा अधिक आणि वार्षिक उत्पन्न एक कोटीपेक्षा अधिक

असलेल्या शहरांमध्ये महानगरपालिका स्थापन केली जाते. तथापि राज्य शासनामार्फत 3 लाख लोकसंख्या असणाऱ्या शहरामध्ये लोकसंख्या, आर्थिक स्थिती व विस्तार हया बाबी विचारात घेऊन (सांगली, नांदेड ) महानगरपालिकेची स्थापना केली आहे. महानगरपालिकेच्या सीमांमध्ये फेरफार करण्याचा अधिकार राज्यशासनाला असतो.

**महानगर पालिकेची रचना-**

मुंबई आणि नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित महानगरपालिकांचा कारभार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये चालविला जातो. ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर १९९३ पासून महानगरपालिकांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. ती एक व्यक्तिगत संस्था असून तिला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व प्रदान केले गेले आहे. त्यामुळे तिला मालमत्तेबाबत करार करणेबाबतचे अधिकार देण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या रचनेत पुढील घटकांचा समावेश होतो.

अ) सर्वसाधारण सभा (विधी सभा /परिषद)

ब) पदाधिकारी (महापौर व उपमहापौर)

क) विविध समित्या.

ड) महानगरपालिका आयुक्त.

महानगरपालिकेच्या प्रतिनिधीक सभेला सामान्य/सर्वसाधारण सभा (महानगरपालिका) असे म्हणतात. तर पालिका सदस्यांना 'नगरसेवक' (Corporator) असे म्हणतात. नगरपालिके प्रमाणेच महानगरपालिकेच्या सदस्य संख्येसाठी लोकसंख्येचा निकष लावण्यात येतो.

**महापौर -**

महापौर हा शहराचा कार्यकारी प्रमुख असतो. त्याला शहराचा प्रथम नागरिक म्हणून ही सन्मान दिला जातो. सार्वत्रिक निवडणूकीत बहुमतवाल्या गटाच्या नगरसेवकाला सर्व निर्वाचित नगरसेवकांमार्फत बहुमताने महापौरपदी निवडले जाते. याच वेळी उपमहापौराची ही निवड केली जाते. महापौर व उपमहापौर हे पदाधिकारी म्हणून कामकाज पाहतात.

**पालिका आयुक्त (municipal Commissioner)-**

महापालिकेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून महानगरपालिका आयुक्त काम पाहतो\ भारतीय प्रशासकीय सेवा (I.A.S.) उत्तीर्ण किंवा सदर दर्जा प्राप्त केलेल्या जेष्ठ अधिका-याकडे आयुक्त पदाची जबाबदारी दिली जाते. मुंबईसारख्या महापालिकांमध्ये कार्यरत असणारा आयुक्त हा मंत्रालयातील सचिव दर्जाचा अधिकारी असतो. नव्या नियमांनुसार राज्य शासनाकडून आयुक्ताची नेमणूक साधारणत: 3 वर्षासाठी केली जाते. तथापि आयुक्ताने महापालिकेच्या हितसंबंधास बाधा आणणारे गैरवर्तन केले किंवा निष्काळजीपणा केला किंवा तो अकार्यक्षम असेल तर एकूण निर्वाचित सदस्यांपैकी ५/८ सदस्य राज्यशासनाकडे आयुक्ताला परत बोलावून घेण्याची विनंती करू शकतात. मात्र महापालिकेच्या आयुक्ताला बडतर्फ करण्याची तरतूद कायदयात नाही. काही वेळेस आयुक्त स्वतः शासनाकडे बदली मागून घेवू शकतात. पालिकेच्या निधीतून आयुक्ताला वेतन व भत्ते दिले जातात.

महानगरपालिका व नगरपालिका यांचे पदाधिकारी व शासकीय अधिकारी तसेच प्रशासनाची कार्ये ही साधारणपणे सारखीच आहेत. दोन्ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना शहरातील सर्व प्रकारचे प्रश्न व समस्या सोडवाव्या लागतात. दोन्ही संस्थांच्या कामकाज पध्दतीत सारखेपणा आहे.

**समारोप -**

नगरपालिका व महानगरपालिका यांची कार्ये शहर विकासाच्याबाबतीत एकसारखी आहेत. केंद्र सरकार व राज्यसरकार यांनी आखलेले विकासाचे धोरण व सोपविलेली शासकीय कार्ये पार पाडावी

लागतात. पिण्याचे पाणी पुरविणे, रस्ते, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, प्रदुषण नियंत्रण अशा अनेक बाबतीत नगरपालिका व महानगरपालिकांना विकास योजना जबाबदारीने राबवाव्या लागतात. शहरांची नैसर्गिक रचना, राजकीय नेतृत्व व प्रशासकीय अधिकारी यांचा दृष्टीकोन तसेच जनतेचा विकास कामांचा आग्रह व जनतेची शहराबददलची जागरूकता यावरच शहरविकास अवलंबून आहे.

**संदर्भ -**

१) चौधरी द.ह. : महाराष्ट्र नगरपरिषदा निवडणूक अधिनियम.
२) प्रा.व्ही.बी. पाटील : महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के ' सागर.
३) र.घ. वराडकर, सौ. नंदा अ. राशिनकर : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था. निराली प्रकाशन, पुणे.
४) प्रा.बी.बी. पाटील : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था. फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५) डॉ. नितीन बिरमल, डॉ. वैशाली पवार : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, डायमंड पब्लिकेशन्स.